महाराष्ट्र शासन
क्रमांक-आरजीडी-१०८८/प्र.क्र.२९/८८/तेरा,

सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : 12 JUL 1988

प्रति,

कुलसचिव,
टिळक महाराष्ट्र विद्यापिठ,
टिळक विद्यापिठ भवन, गुलटेकडी,
पुणे-४११ ०३७.

विषय : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे मधील विशारद [बी.ए] पदवीस सांविधिक विद्यापीठाच्या बी.ए.पदवीशी समकक्षता देण्याबाबत....

संदर्भ : आपले पत्र क्रमांक १८०९, दिनांक ६.१.१९८८.

महोदय,

आपल्या उपरोक्त पत्रासंदर्भात आपणास असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठास केंद्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यान्वये "अभिमत विद्यापीठ" [डीम्ड युनिव्हर्सिटी] म्हणून मान्यता दिलेली आहे. तसेच या अभ्यासक्रमास शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगानेही मान्यता दिलेली आहे. सबब टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची सामाजिक शास्त्र विशारद ही पदवी शासकीय सेवा प्रवेशासाठी इतर स्वायत्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेप्रमाणे मान्यताप्राप्त आहे.

आपली,

[ शैलजा दिघे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पारंगत (स्पेशल सायन्सेस) परीक्षा एम्.ए.समकक्ष ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.आरजीडी १०८१/६१८/तेरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर १९८१.

संदर्भ:- १) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचे सचिव, शिक्षण व सेवा योजन विभाग यांना पाठविलेले दि.७/४/८१ चे पत्र.

२) सामान्य प्रशासन विभागाचे, सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना पाठविलेले क्र.आरजीडी १०८१/६१८/तेरा दि.२/७/८१ चे पत्र.

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.२४२/४७२५/दोन, दि.२५/८/८१ चे पत्र.

शासन निर्णय:- टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पारंगत (सोशल सायन्सेस) या परीक्षेस या शासनाच्या नियंत्रणा खालील विद्यापीठांनी प्रदान केलेल्या एम्.ए.समकक्ष मान्यता देण्याचा प्रस्ताव काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत लोकसेवा आयोगाचा सल्ला घेऊन वरील परीक्षेस शासकीय कार्यालयातून नियुक्तीसाठी म्हणून या राज्यातील विद्यापीठांच्या एम्.ए. समकक्ष मान्यता देण्याचे शासनाने ठरविले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature], कु.मा.प.

स.मे. लाखी.
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्तांचे कार्यालय, मुंबई (पत्राने)
निवडनस्तीकरिता मंत्रालयीन विभागांखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख
सर्व मंत्रालयीन विभाग.